# डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव

## राष्ट्रीय सेवा योजना एकक

## स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा अहवाल (1 ते 15 ऑगस्ट 2019)

रासेयो एकक हा राष्ट्रीय उपक्रम आहे. या एककामार्फत विविध उपक्रम राबविले जातात. या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देशाची, समाजाची सेवा करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते. तसेच विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील नेतृत्व व व्यक्तिमत्व विकासाला चालना देण्याचे कार्य केले जाते. असे विविध उपक्रम रासेयो एकक राबवित असते. स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा हा असाच एक महत्वपूर्ण उपक्रम आहे. या अभियानाची घोषणा 2016 मध्ये झाली. मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या 'स्वच्छ भारत, स्वस्थ भारत' या संकल्पनेतून उदयास आलेला उपक्रम आहे.

आमच्या महाविद्यालयात सदर अभियान रासेयो एककाने अतिशय उत्कृष्टरित्या राबविले. यात नाविन्यपूर्ण कार्यक्रम घेण्यात आले यात स्वच्छता शपथ, स्वच्छता विषयावर व्याख्याने, महाविद्यालय स्वच्छता, सार्वजनिक स्थळ स्वच्छता, दत्तकगाव स्वच्छता व जनजागृती रॅली, बालकांना स्वच्छता मार्गदर्शन, स्वच्छता रॅली व स्वातंत्र्यदिनी स्वयंसेविकांना उद्‌बोधन इ. कार्यक्रमांनी स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा साजरा करण्यात आला. 'स्वच्छ भारत समृध्द भारत' या उक्तीला सत्य ठरविण्याची संपूर्ण जबाबदारी भारत वासियांची आहे. हे लक्षात घेऊन पंधरवाड्यात कार्यक्रम घेण्यात आले. राबविलेल्या उपक्रमांची सविस्तर माहिती अहवाल पुढीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

### कार्यक्रम 1 (दि. 1 ऑगस्ट 2019) : स्वच्छता शपथ

महाविद्यालयातील रासेयो एकक आयोजित 'स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा' चे उद्‌घाटन मा. उपप्राचार्य बी. पी. सावखेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुजाता गायकवाड यांनी केले. त्यानंतर स्वयंसेविकांना उपप्राचार्य सावखेडकर यांनी स्वच्छता शपथ दिली. यावेळी स्वच्छता शपथ सर्वांनी जबाबदारीने आंमलात आणण्याचे आवाहन मान्यवरांनी केले.





स्वच्छता शपथ घेतांना रासेयो स्वयंसेविका

उद्‌बोधनात उपस्थित विद्यार्थिनी

## कार्यक्रम -02 - व्याख्यान :- स्वच्छतेचे सर्वांगीण महत्त्व

### वक्ते :- समाजसेविका ॲड. मंजुळा मुंदडा, जळगाव

दि. 1 ऑगस्ट 2019 रोजी स. 11.00 वा. जळगाव शहरातील समाजसेविका ॲड. मंजुळा मुंदडा यांचे `स्वच्छतेचे सर्वांगीण महत्त्व` या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. यावेळी बोलतांना त्या म्हणाल्या, स्वच्छता ही विचारांतून आचरणात आणण्याची क्रिया आहे. मनुष्य समाजशील प्राणी आहे. त्यासाठी समाजहित जोपासणे हे त्याचे कर्तव्य आहे. ज्या प्रमाणे स्वत:चे घर स्वच्छ ठेवतो त्याप्रमाणे देशात देखील स्वच्छता ठेवणे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे, असे सांगत विद्यार्थिनींना सर्वांगीण स्वच्छतेचे महत्त्व पटवुन दिले. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य बी. पी. सावखेडकर, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुजाता गायकवाड, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. संजय बाविस्कर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार प्रा. दीपक पवार यांनी केले. या कार्यक्रमास रासेयो एककातील स्वयंसेविका उपस्थित होत्या.





ॲड मंजुळा मुंदडा व्याख्यानप्रसंगी बोलतांना

## कार्यक्रम - 3: दि. 5 ऑगस्ट 2019 : महाविद्यालय स्वच्छता उपक्रम

दि. 5 ऑगस्ट 2019 रोजी महाविद्यालयातील वर्गखोल्या, प्रयोगशाळा, सभागृह, ग्रंथालय, व्हरांडे इ. वास्तुंची स्वच्छता स्वयंसेविकांनी दु. 3 ते 6 या काळात केली.

स्वच्छता केल्यावर निघालेल्या कचऱ्याचे ओला व सुका कचरा असे विभाजन करून महाविद्यालयातील परिसर स्वच्छता करण्यात आली. या उपक्रमात स्वयंसेविका सहभागी होत्या. त्यांना श्रम परिहार यावेळी देण्यात आला.






**महाविद्यालय परिसराची स्वच्छता करतांना स्वयंसेविका**

## कार्यक्रम - 4: दि. 7 ऑगस्ट 2019 : बस स्थानक परिसर स्वच्छता उपक्रम

दि. 7 ऑगस्ट 2019 रोजी दुपारी 2 ते 5 या वेळात जळगाव बस स्थानक आवार स्वयंसेविकांनी सफाई केला. प्रवासी बैठक व्यवस्था, बस स्थानक कंट्रोल रूम, प्लॅटफॉर्म इ. ठिकाणी चार गटात स्वयंसेविकांची विभागणी करून कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या सहकार्याने स्वच्छता उपक्रम राबविला. यावेळी जळगाव बसस्थानक आगार प्रमुख मा. बागुल मॅडम यांनी स्वयंसेविकांचे कौतुक केले. सदर उपक्रमात स्वयंसेविका उपस्थित होत्या.

यानंतर श्रम परिहार वाटप करण्यात आला. या उपक्रमात कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुजाता गायकवाड, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. संजय बाविस्कर, प्रा. दीपक पवार, प्रा. जितेंद्र मोरे सहभागी होते. यानंतर स्वयंसेविकांनी सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व जाणून घेतले.

सदर कार्यक्रम आटोपल्यानंतर स्वयंसेविकांना पुढील कार्यक्रमांच्या अंमलबजावणी बाबत कार्यक्रम अधिकाऱ्यांनी सूचना दिल्या व स्वातंत्र्यदिनी घ्यावयाच्या स्वच्छता अभियानाबाबत माहिती दिली.



जळगाव बस स्थानक आगार स्वच्छ करतांना रासेयो स्वयंसेविका एकक

## कार्यक्रम - 5 : दि. 13 ऑगस्ट 2019 : रासेयो दत्तक गाव (टाकरखेडा) स्वच्छता अभियान व जनजागृती रॅली

दि. 13 ऑगस्ट 2019 मंगळवार रोजी सकाळी 9 ते दुपारी 3 या वेळेत `टाकरखेडा` या दत्तक गावात रासेयो एककाने श्रमदान केले.

यामध्ये टाकरखेडा ग्रामपंचायत परिसर, हनुमान मंदिर आवार, जि. प. शाळा मैदान, गावातील प्रमुख रस्ते यांची झाडलोट व स्वच्छता केली. यानंतर स्वच्छता व आरोग्याबद्दल लहान मुलांशी स्वयंसेविकांनी चर्चा केली. एकंदरित गावातील मंडळींनी रासेयो एककच्या कामगिरीचे कौतुक केले. त्यानंतर गावातून स्वच्छता प्रबोधन रॅली काढण्यात आली. त्यातून व्यसनमुक्ती व स्वच्छतेसंदर्भात संदेश देण्यात आला. या रॅलीचे उद्घाटन टाकरखेडा या गावाच्या सरपंच सौ. मनिषा पाटील यांच्या हस्ते केले.




टाकरखेडा येथे स्वच्छता करतांना स्वयंसेविका आणि रॅली

## कार्यक्रम - 6: दि. 15 ऑगस्ट 2019 :स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा समारोप

स्वातंत्र्य दिवस समारोह प्रसंगी रासेयो एककातील सर्व स्वयंसेविका उपस्थित होत्या. यानंतर 'स्वच्छ भारत अभियान पंधरवाडा' चे समारोप प्राचार्य डॉ. एस. एस. राणे यांच्या मुक्तसंवादाने करण्यात आला. 'स्वच्छता विषयी विविधांगी विचार' यावेळी त्यांनी मांडले. महात्मा गांधी यांचे स्वच्छतेविषयी विचार याप्रसंगी त्यांनी सांगितले. सार्वजनिक मालमत्तेचे जतन करून देश विकासात प्रत्येकाने हातभार लावणे गरजेचे आहे. रासेयो हे समाज प्रबोधनासाठी कार्य करणारे एक उत्कृष्ट योजना असल्याचे मत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले. यावेळी उपप्राचार्य श्रीमती आर. एन. महाजन, सौ. एस. बी. पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सुजाता गायकवाड, डॉ. संजय बाविस्कर, प्रा. जितेंद्र मोरे, एन. सी. सी. कॅप्टन प्रा. नंदा बेंडाळे यांसह प्राध्यापक बंधू-भगिनी तसेच रासेयोच्या स्वयंसेविका उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. दीपक पवार यांनी केले.




**समारोप प्रसंगी मनोगत व्यक्त करतांना प्राचार्य डॉ. एस. एस. राणे**

## कार्यक्रम - 7 : दि. 15 ऑगस्ट 2019 : स्वच्छता प्रबोधन रॅली

दि. 15 ऑगस्ट 2019 रोजी सकाळी 10 ते 11 यावेळात स्वच्छतेसंदर्भात प्रबोधन होण्यासाठी रासेयो स्वयंसेविकांची रॅली महाविद्यालयापासून स्वातंत्र्य चौक परिसरात काढण्यात आली. या रॅलीला प्राचार्य डॉ. एस. एस. राणे यांनी हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ केला.

स्वच्छ भारत अभियान पंधरवाड्याच्या निमित्ताने घेतलेल्या सर्व कार्यक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना एककच्या स्वयंसेविकांनी व अधिकाऱ्यांनी परिपत्रकाप्रमाणे योग्य कार्यक्रम घेऊन समाजात स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला.






**स्वच्छता जनजागृती रॅलीमध्ये सहभागी स्वयंसेविका**

थोडक्यात, स्वच्छतेविषयी राबविलेल्या या विविध उपक्रमांतून स्वच्छ भारत स्वस्थ भारत व्हावा हा उद्देश होता. स्वच्छता पंधरवाडा यशस्वीतेसाठी मा. प्राचार्य डॉ. एस. एस. राणे, उपप्राचार्य बी. पी. सावखेडकर, उपप्राचार्य श्रीमती आर. एन. महाजन, रासेयोच्या माजी कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. एस. एस. चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले.

**स्थळ** : जळगाव

दि. 19/08/2019

NSS Programme Officer
Dr A.G.D Bendale Mahila
Mahavidyalaya,JALGAON

PRINCIPAL
Dr. Annasaheb G.D. Bendale
Mahila Mahavidyalaya,Jalgaon